# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ 1797 /२०१८ दिनांक : ०७ मे, २०१८

**परिपत्रक** :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०१८ च्या परीक्षांच्या उत्तरपुस्तिका तपासणीचे काम On Screen Marking द्वारे सुरू झालेले आहे.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही तांत्रिक अडचणींमुळे काही महाविद्यालयातील OSM CAP Centres सुरू न झाल्यामुळे उत्तरपुस्तिका मुल्यांकनाचे काम (On Screen Marking) बंद आहे. अशा परिस्थितीत सदर महाविद्यालयातील प्राध्यापक त्यांच्या Neighbouring महाविद्यालयात मुल्यांकनासाठी जातात. परंतु त्या महाविद्यालयात त्यांना मुल्यांकनासाठी (On Screen Marking) नाकारण्यात येत आहे. आपल्याला ज्ञात असेलच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९३ अन्वये विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या परीक्षा व त्यांचे निकाल वेळेत लावणे बंधनकारक आहे. अशा परिस्थितीत ज्या महाविद्यालयाकडून परीक्षेच्या कामकाजासाठी अडथळा निर्माण होत असेल अशा महाविद्यालयांवर प्रशासकीय कार्यवाही होऊ शकते.

उपरोक्त बाबतीत सर्व महाविद्यालयांनी असे सुचित करण्यात येते की, तांत्रिक अडचणींमुळे ज्या महाविद्यालयातील OSM CAP Centres बंद असतील अशा त्यांच्या Neighbouring महाविद्यालयातून मुल्यांकनासाठी येणा–या प्राध्यापकांस मुल्यांकन करण्याची परवानगी देण्यात यावी आणि विद्यापीठास परिक्षेच्या कामासाठी सहकार्य करावे. हि विनंती

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रती,

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित व विद्यापीठ संचालीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक–संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव.

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३.
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.


क्र. परीक्षा/कें.मु.कें./ 1796 /२०१८

दिनांक : ०७ मे, २०१८

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०१८ च्या परीक्षांच्या उत्तरपुस्तिका तपासणीचे काम संगणकाधारित On Screen Marking प्रणालीद्वारे सर्व महाविद्यालयांच्या OSM CAP Centres सुरू झालेले आहे.

उपरोक्त बाबतीत सर्व महाविद्यालयांनी असे सुचित करण्यात येते की, त्यांच्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २०१७–२०१८ या शैक्षणिक वर्षाकरिता एकूण Enrollment असलेल्या विद्यार्थी संख्येच्या दीड पट मुल्यांकन (उदा. १०० नोंदणीकृत विद्यार्थी संख्येच्या १.५ पट गुणीले एकूण विषय म्हणजे १००X १.५ X ६ =९००) त्यांच्या महाविद्यायातील प्रत्येक प्राध्यापकांकडून करून घेण्यात यावे. जेणेकरून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९३ अन्वये मुंबई विद्यापीठास प्रथम सत्र २०१८ परीक्षेचे निकाल वेळेत घोषित करणे शक्य होईल.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रती,

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित व विद्यापीठ संचालीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक–संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव.